बंजारा शिक्षण संस्था द्वारा संचलित

# कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, हनेगाव ता.देगलूर जि.नांदेड



# राष्ट्रवादाचे आधारभूत घटक


## डॉ.मानवते उत्तम हुसनाजी

प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख

# राष्ट्रवादाचे आधारभूत घटक

राष्ट्रवाद ही मानसिक भावनात्मक ऐक्याची भावना आहे. तथापि ही भावना निर्मिती मनुष्याची सहज प्रवृत्ती नाही. अशी ऐक्याची भावना निर्माण होण्यासाठी अनेक घटक जबाबदार असतात. हे घटक कार्यरत असल्यामुळेच एकात्मतेची भावना निर्माण होते. म्हणून हेच घटक राष्ट्रवादाचे आधारभूत घटक होत ते खालीलप्रमाणे

## 1) भौगोलिक एकता (Geographic Unity)

राष्ट्रीयत्वाच्या भावनेसाठी चालना देणारा भौगोलिक एकता हा महत्त्वाचा घटक आहे. भौगोलिक एकता याचा अर्थ संपूर्ण भूभाग सलग असतो. तो कुठेही खंडीत अथवा अलग झालेला नसतो. म्हणून अशा अखंड भूप्रदेशावर वास्तव्य करणा-या लोकांमध्ये भौगोलिक एकतेमुळे राष्ट्रवादाची भावना वाढीस लागते. उदा: ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, श्रीलंका ही अखंड भूप्रदेश असलेली राष्ट्रे आहेत. प्राचीन भारतीय संस्कृतीसुद्धा टिकून राहण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे हिमालयापासून हिंद महासागरापर्यंत असलेला अखंड भूप्रदेश होय. भौगोलिकदृष्ट्या दूर असलेल्या लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण होत नाही. उदा: 1971 पूर्वीचा पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान, मलेशिया आणि सिंगापूर इ. तथापि सलग भूभाग असतानासुद्धा अनेक राष्ट्रे अस्तित्वात येऊ शकतात.

## 2) धार्मिक एकता (Unity of Religion)

धर्म व्यक्ती-व्यक्तीमध्ये भावनात्मक ऐक्य निर्माण करणारा महत्त्वाचा घटक आहे. समान धर्म आणि धार्मिक परंपरा असणाऱ्या लोक समुदायात एकात्मतेची भावना परिदृढ असते. म्हणून अशा समुदायाचे राष्ट्र निर्माण होवून त्यांच्यामध्ये राष्ट्रवादाची भावना अधिक प्रबळ बनलेली असते. उदा: बॅरिस्टर जीना यांनी मांडलेल्या द्विराष्ट्राचा सिद्धांत हा केवळ धर्माच्या आधारावर मांडलेला होता. त्यामुळे मुस्लिम धर्माचे स्वतंत्र पाकिस्तान हे राष्ट्र अस्तित्वात आले. जगामध्ये पाकिस्तान, नेपाळ, बेल्जियम, हॉलंड यासारखी धार्मिक एकता असलेली राष्ट्रे अस्तित्वात आली असली तरी सुद्धा राष्ट्रवादाच्या निर्मितीस धर्म हा एकमेव आधारभूत घटक नाही. अनेक धर्मांच्या लोकांमध्ये सुद्धा राष्ट्रवादाची भावना निर्माण होवू शकते.

उदा: भारत, अमेरिका याशिवाय एकाच धर्माने अनेक राष्ट्रसुद्धा अस्तित्वात येवू शकतात. थोडक्यात आधुनिक काळात वैज्ञानिक प्रगतीमुळे धर्म हा राष्ट्रवादाचा प्रमुख आधार राहिलेला नाही.

## 3) वांशिक एकता (Unity of Race)

लिकॉक आणि बर्जेस या विचारवंतांनी राष्ट्रवादाच्या वंश या घटकावर जास्त भर दिलेला आहे. आपण सर्वजण एकाच रक्ताचे आहोत या जाणीवेमुळे एकात्मतेची भावना वाढीस लागते. समान शारीरिक ठेवन असल्यामुळे व्यक्ती व्यक्तीमध्ये सहकार्य आणि आपुलकीची भावना वाढीस लागते. आपला वंश श्रेष्ठ आहे या भावनेतून राष्ट्रवादाची निर्मिती होत असते.

उदाः मुसोलिनी आणि हिटलर यांनी वंश श्रेष्ठत्वाच्या आधारावरच राष्ट्रवादाची निर्मिती केली आहे. असे असले तरी आधुनिक काळात वंश संकर मोठ्या प्रमाणात घडून येत असल्यामुळे वंश शुद्धता राहिलेली नाही. त्यामुळे अमेरिका, भारत यांसारखी भिन्न वंशीयांची राष्ट्रेसुद्धा अस्तित्वात आहेत. **रॅम्सेप्यूर** यांच्या मते, ''आज जगामध्ये एकही राष्ट्र अस्तित्वात नाही की ज्या ठिकाणी जातीय मिश्रण नाही.'' थोडक्यात आधुनिक काळात वंश हा राष्ट्रवादाचा प्रभावी घटक राहिलेला नाही.

## 4) भाषिक एकता (Unity of Language)

रेम्सेम्यूर या विचारवंताच्या मते राष्ट्रवादाच्या बाबतीत वंशापेक्षा भाषेचे स्थान श्रेष्ठ आहे. समान भाषेतून समान प्रेरणा, समान विचार, समान आशा-आकांक्षा व्यक्त होत असतात. **ब्लटंश्लीच्या** मते, ‘‘भाषा राष्ट्रवादाचे अविभाज्य अंग आहे.’’ **गार्नर** यांनी म्हटले आहे की, ‘‘वांशिक एकतेपेक्षा अधिक एकता राष्ट्रवादाच्या निर्मितीस प्रभावी घटक सिद्ध झालेले आहे.’’ चीन, जपान, जर्मनी, इटली या राष्ट्रांमध्ये भाषेच्या आधारावर फार मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादाची निर्मिती झाली आहे. भाषिक विविधतेमुळे राष्ट्रवाद दुर्बल बनतो.

उदाः भाषिक विविधतेमुळे भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेस अनेकवेळा बाधा निर्माण झालेली आहे. असे असले तरीसुद्धा एकच भाषा बोलणा-यांची अनेक राष्ट्रे अस्तित्वात असू शकतात. तसेच बहू भाषिकांचे सुद्धा राष्ट्र अस्तित्वात येवू शकते.

## 5) समान संस्कृती (Unity of Culture)

समान संस्कृती, समान चालीरीती, प्रथा, परंपरा, साहित्य, आचार-विचार, व्यवहार, वेश-भूषा, शिक्षण, इतिहास, सण-समारंभ या सर्वांमुळे राष्ट्रवादाची भावना अधिक मजबूत होत असते. कारण या सर्वांमधून जनसमुदायामध्ये आपण एक असल्याची जाणीव वाढीस लागते. आणि या संस्कृतीचे जतन करण्यासाठी संस्कृतीचा प्रचार करण्यासाठी तो जनसमुदायच प्रयत्नशील असतो. ही प्रवृत्ती सुद्धा राष्ट्रवाद आहे.

उदा: संपूर्ण भारतामध्ये समान संस्कृती अस्तित्वात असल्यामुळे प्राचीन काळापासून भारत हे राष्ट्र टिकून आहे.

## 6) समान राजकीय उद्देश (Common Political Aspiration)

राष्ट्रांतर्गत सर्व मतभेदांना दूर करून राजकीय उद्देश असेल तर त्यामधून सुद्धा राष्ट्रवादाची भवना निर्माण होत असते. कारण भावनिक ऐक्यामुळे राष्ट्रची निर्मिती होत असते. ज्या राष्ट्रातील लोकांमध्ये समान राजकीय ध्येय व आकांक्षा असतील त्या ठिकाणी राष्ट्रवादाची भावना प्रभावीपणे अस्तित्वात येते. ''समान राजकीय उद्दिष्टांमधूनच राष्ट्र बनविण्याची इच्छा व्यक्त होते. म्हणून तोच राष्ट्रवादाचा मूळ आधार आहे.'' असे **टॉयनबी** यांचे मत आहे. 1947 च्या पूर्वी ब्रिटिशांच्या पारतंत्र्यातून मुक्त होणे या समान राजकीय उद्देशामुळे भारतीयांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण झालेली होती. इस्त्राईलने अल्पावधीमध्ये लष्करी क्षेत्रात जी काही प्रगती केली त्याचे मुख्य कारण ज्यू लोकांमध्ये अरबांना पराभूत करणे हा असलेला एकमेव उद्देश होय.

## 7) समान हितसंबंध (Common Interests)

संपूर्ण जन समुदायाचे हित समान असेल किंवा एका विशिष्ट उद्देशातून समान हितसंबंधाची पुर्तता होत असेल तर लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना वाढीस लागते. हे हितसंबंध अनेक प्रकारचे असू् शकतात. आर्थिक, राजकीय, सामाजिक अशा प्रकारचे हितसंबंध असू् शकतात. जपानमध्ये उदयास आलेल्या राष्ट्रवादाचे एक प्रमुख कारण म्हणजे त्या ठिकाणच् या लोकांचे समान आर्थिक हितसंबंध होय.

राष्ट्रवादाच्या वरील आधारभूत घटकांशिवाय सार्वजनिक इच्छा, सार्वभौमत्व या घटकांमुळेसुद्धा राष्ट्रवाद निर्मितीस चालना मिळते. राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी वरील सर्व घटक आधारभूत मानले जात असले तरीसुद्धा प्रत्येक देशात प्रत्येक काळात हे सर्वच घटक एकाच वेळी उपलब्ध असतील असे नाही. तर या घटकांपैकी एखादा घटक अधिक प्रभावी असतो व इतर घटक कमी प्रभावशाली असतात. किंवा अस्तित्वात नसतात. शेवटी राष्ट्रवाद ही एक मानसिक भावना असल्यामुळे तिची निर्मिती अथवा विकास एखाद्या घटकाच्या अभावामुळे थांबत नाही.

# धन्यवाद